C

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8 ]
Total No. of Printed Pages : 8 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 48 ]
Total No. of Questions : 48 ]

**CCE PR**
**REVISED**

Question Paper Serial No. **11**

येथून कापा.

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M**
**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ
# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ/ New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 23. 09. 2020 ] [ Date : 23. 09. 2020
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 48 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

Tear here

I. **खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा :** $8 \times 1 = 8$

1. साल्बाईच्या तहाने हे युद्ध संपले.

   (A) दुसरे अँग्लो-मराठा युद्ध (B) दुसरे अँग्लो-शिख युद्ध

   (C) पहिले अँग्लो-मराठा युद्ध (D) पहिले अँग्लो-म्हैसूर युद्ध.

2. 1938 च्या हरिपूरच्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष हे होते.

   (A) सरदार वल्लभभाई पटेल (B) डॉ० बी० आर० आंबेडकर

   (C) बाळ गंगाधर टिळक (D) सुभाष चंद्र बोस.

3. 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांतीचा मुख्य उद्देश हा होता.

   (A) संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना ( UNO )

   (B) मानवी हक्काचे रक्षण

   (C) परकियांचे आक्रमण थांबविणे

   (D) राष्ट्रसंघाची स्थापना करणे.

4. नर्मदा बचाव आंदोलनाचे नेतृत्व यानी केले.

   (A) मेधा पाटकर (B) डॉ० शिवराम कारंत

   (C) कुसुम सोरब (D) सुंदरलाल बहुगुणा.

5. बालकांचा सहाय्य दूरध्वनी क्रमांक हा आहे.

   (A) 1098 (B) 1090

   (C) 1089 (D) 1097.

6. खालील पैकी योग्य जुळणारी जोडी ही आहे.

(A) आंधिस - पश्चिम बंगाल (B) काल बैसाकी - पंजाब

(C) मँगोशॉवर्स - तमीळनाडू (D) कॉफीकारंजा - कर्नाटक.

7. 2014 मध्ये भारताचे मानवी विकासाचे सुचक इतके होते.

(A) 0.586 (B) 0.344

(C) 0.562 (D) 0.856

8. धवल क्रांतीचे जनक

(A) डॉ० प्रताप रेड्डी (B) नारायण मूर्ती

(C) वर्गिस कुरियन (D) अझीम प्रेमजी.

II. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :** 8 × 1 = 8

9. 1798 नंतर हैद्राबादच्या संस्थानात ब्रिटिशांची एक सैन्य तुकडी ठेवावी लागली. का ?

10. रामकृष्ण मिशन ( रामकृष्ण मठ ) ची स्थापना का केली ?

11. अन्न आणि कृषिविषयक संघटनेचा ( FAO ) मुख्य उद्देश काय ?

12. कैगा अणुभट्टी विरोधी चळवळ का करण्यात आली ?

13. बाजूकडील माती ( लॅटेराईट माती ) कशी बनते ?

14. लोकसंख्या घनतेची व्याख्या लिहा.

15. एका देशाचे दरडोई उत्पन्न कसे मोजले जाते ?

16. दरवर्षी 15 मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक दिन' म्हणून का समजला जातो ?

III. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार मुद्यात लिहा :** 18 × 2 = 36

17. कोणत्या घटकांनी युरोपियनांना भारताकडे येण्याचा नविन जलमार्ग शोधण्यास प्रेरित केले ?

18. भारताच्या फाळणी पासून निर्वासितांची एक गंभीर समस्या उद्भवली. सिद्ध करा.

19. पुष्कळ गोष्टींचा आपल्या परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीवर प्रभाव पडला. कसा ?

**किंवा**

सुरक्षा समिती ही संयुक्त राष्ट्रसंघटनेचे ( UNO ) केंद्र ( कॅबिनेट ) असल्यासारखे का आहे ?

20. मुलाच्या अपहरणाने मुलांचा सर्वांगोण विकास खुंटतो. कसा ?

**किंवा**

श्रमविभागणी फार उपयोगाची आहे. कशी ?

21. भारताच्या पूर्व किनारपट्टीची मैदाने ही पश्चिम किनारपट्टीच्या मैदानापेक्षा वेगळी कशी ?

22. खालोल वैयक्तिक दळणवळण आणि सामुहिक दळवळण साधनांची वर्गवारी करुन लिहा.

( टपाल ( पत्र ), दुरदर्शन, फॅक्स, रेडिओ )

23. सार्वजनिक खर्चाचे उद्देश हे देशाच्या सर्वांगोण विकासासाठी महत्वाचे ( पुरक ) आहेत. स्पष्ट करा.

24. बँक खात्यांच्या वेगवेगळ्या प्रकारांची नावे सांगा.

25. बक्सारच्या लढ़ाईचे परिणाम कोणते ?

26. दुसरे अँग्लो-म्हैसूर युद्ध का झाले ?

27. फॅसिस्ट पक्षाची ( Fascist Party ) लक्षणे कोणती ?

28. भ्रष्टाचारावर नियंत्रण कसे ठेवता येते ?

29. संयुक्त राष्ट्र संघटनेचे ( UNO ) मुख्य उद्देश कोणते ?

30. असंघटित क्षेत्रातील कामगाराना कोणत्या समस्याना सामोरे जावे लागते ?

31. मातीची धूप शेतीवर कसा परिणाम करते ?

32. हवाई वाहतूकोचे ( वायूमार्ग ) फायदे कोणते ?

33. उत्पादनाच्या पुरवठ्यामध्ये बदल घडून येतो. का ?

34. ग्राहक संरक्षण कायद्याचे मुख्य उद्देश कोणते ?

IV. **खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात उत्तरे लिहा :** 9 × 3 = 27

35. ब्रिटिश जमीन महसूल पद्धतीचे परिणाम भारतीय शेतीवर झाले. स्पष्ट करा.

36. तिसरे आणि चौथे अँग्लो-म्हैसूरच्या युद्धाने. म्हैसूरच्या टिपू सुलतानाचे बळ कमी झाले. सिद्ध करा.

**किंवा**

भारतीय संस्कृती आणि राजकिय क्षेत्रासाठी ॲनी बेझंट यांचे योगदान अविस्मरणीय ( न विसरव्यासारखे ) आहे. स्पष्ट करा.

37. 20 व्या शतकात चीनचा कसा विकास झाला ?

38. भारत आणि रशिया यांच्यात उत्तम बंधुत्वाचे नाते आहे. वर्णन करा.

39. अलिकडच्या दिवसात अस्पश्यतेच्या समस्या कमी झाल्या आहत. स्पष्ट करा.

40. सध्याच्या वर्षात अरण्यांचा प्रदेश कमी होत आहे. का ?

41. जास्तीत जास्त लोखंड व पोलाद कारखाने हे ओरिसा आणि पश्चिम बंगाल प्रदेशात केंद्रिकृत ( स्थायिक ) झाले आहेत. का ?

**किंवा**

मानवाच्या क्रिया या महापूर आणि दरडी कोसळण्याचे ( Landslides ) कारण बनल्या. स्पष्ट करा.

42. पंचायत राज व्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये ( लक्षणे ) सांगा.

**किंवा**

पैशाच्या विकासाचे वेगवेगळे टप्पे सांगा.

43. जागतिकीकरण एका देशाच्या विकासासाठी कसे उपयोगाचे आहे ?

**किंवा**

एका देशाच्या आर्थिक विकासासाठी उद्योजक कसे मदत कतात ?

V. **खालील प्रश्नाची प्रत्येकी आठ वाक्यात उत्तर लिहा :** $4 \times 4 = 16$

44. असहकार चळवळीतील प्रमुख कार्यक्रमांचे वर्णन करा.

45. 1857 बंडाच्या राजकोय आणि शासकीय कारणांचे वर्णन करा.

**किंवा**

स्वातंत्र्य चळवळीतील ''उदार राष्ट्रवादाच्या'' ( Liberal Nationalism ) काळाचे वर्णन करा.

46. सध्याच्या दिवसाची परिस्थिती ही महिलाना उत्तम दर्जा साधण्यास मदत करते. कशी ?

47. गहू आणि ऊस पिकाच्या लागवडीसाठी कोणत्या घटकांची आवश्यकता आहे ?

VI. 48. **भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि त्यामध्ये खालील ठिकाणे दाखवा :**

1 + 4 = 5

A) 82 $\frac{1^\circ}{2}$ पूर्व रेखांश

B) नर्मदा नदी

C) भाक्राना-नगल योजना

D) बॉम्बे हाय.

**अंध विद्यार्थ्यांकरिता पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 48 च्या ऐवजी )**

नदी खोऱ्यातील बहुउद्देशोय योजना कशा उपयोगाच्या आहेत ? 5